| MHYA150005982020 | सं.फौ.प्रकरण क्र.२९८/२०२०.<br>निशाणी क्र.१३<br>राजलक्ष्मी वि. नवनाथ. |
| --- | --- |

**संक्षीप्त फौजदारी प्रकरण क्र.२९८/२०२० मधील निशाणी क्र.१३ खालील आदेश**

**(पारीत दिनांक ०७.०५.२०२६)**

प्रस्तुत अर्ज फिर्यादी यांनी आरोपीला अटक वॉरंट काढण्यात यावा याकरीता सादर केला आहे.

२. प्रस्तुतचे प्रकरण परक्राम्य संलेख अधिनीयम १८८१ (निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट १९८१) चे कलम १३८ अन्वये राजलक्ष्मी कॉऑपरेटीव क्रेडीट सोसायटी यांनी दाखल केले आहे. प्रस्तुतचे प्रकरण सन २०२० पासुन प्रलंबित आहे. प्रस्तुत प्रकरणात आरोपीला उपस्थीत ठेवण्याकरीता, प्रकरण पुढे चालवण्याकरीता नेर अर्बन कॉऑपरेटीव क्रेडीट सोसायटी यांनी कोणतीही योग्य ती काळजी घेतलेली नाही. आजरोजी प्रकरण खारीज करण्याकरीता असल्यामुळे प्रस्तुतचे अर्ज सादर केलेले दिसत आहे.

३. प्रस्तुत अर्जातील विनंती विचारात घेता न्यायाच्या दृष्टीने फिर्यादी यांना शेवटची संधी देण्यात येते, फिर्यादी यांनी प्रस्तुत प्रकरणात योग्य ती कार्यवाही घेण्याकरीता केलेल्या विलंबाबात त्यांच्यावर खर्च लागणे योग्य व रास्त आहे म्हणुन सर्व बाबींचा विचार करीता प्रस्तुतचा अर्ज रक्कम रुपये १०००/- खर्चाच्या अटीसह मंजुर करण्यात येतो. सदर रक्कम रुपये १०००/- पुढील तारखेपर्यंत न भरल्यास प्रकरण खारीज करण्यात येईल याची फिर्यादीने नोंद घ्यावी. सबब मी खालील आदेश पारित करत आहे.

# <u>आदेश</u>

१. अर्ज खर्चाच्या अटीसह अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. फिर्यादी यांनी रक्कम रुपये १०००/– जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या नावे पुढील तारखेपर्यंत भरावे.

३. फिर्यादी यांनी रक्कम रुपये १०००/–पुढील तारखेपर्यंत न भरल्यास प्रकरण खारीज करण्याच्या आदेशाला ठेवण्यात येईल.

४. फिर्यादीने रक्कम रुपये १०००/–वर नमुद केल्याप्रमाणे भरल्यानंतर आरोपीला जामीनपात्र वॉरंट रक्कम रु.२०००/– करीता काढण्यात यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात येतो. )

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2026.05.07 18:44:17 +0530

नेर. (जी. सी. फुलझळके)

दिनांक – ०७/०५/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नेर.

<u>**CERTIFICATE**</u>

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | B. N.Nare |
| Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C., Ner. |
| Date | :- | 07/05/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 07/05/2026 |
| Order uploaded on | :- | 07/05/2026 |